**ठळक बातम्या**

- वीज कर्मचारी संघटनांनी पुकारलेला ७२ तासांचा संप मागे
- ॲप आधारित प्रवासी वाहतूक कंपन्यांसाठी राज्य सरकारचे नियम जाहीर, जास्तीत जास्त दीडपट शुल्क मर्यादेचं बंधन
- भारत आणि अफगाणिस्तानच्या परराष्ट्रमंत्र्यांमध्ये चर्चा, भारतविरोधी कारवाया करणाऱ्या गटांना थारा न देण्याचं अफगाणिस्तानचं आश्वासन
- गाझा पट्टीत दुपारपासून शस्त्रसंधीची अंमलबजावणी सुरू
- यंदाचा शांततेचा नोबेल पुरस्कार व्हेनेझुएलाच्या मारिया कोरीना मच्याडो यांना जाहीर

**आणि**

- वेस्ट इंडिज विरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात पहिल्या दिवसअखेर भारताच्या ३१८ धावा, यशस्वी जयस्वाल १७३ धावांवर नाबाद

**<><><><>**

राज्यात कालपासून सुरू असलेला संप वीज कर्मचारी संघटनांनी मागे घेतला आहे. या ७२ तासांच्या संपाविरोधात वीज महावितरण कंपनीने मुंबई औद्योगिक न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावरच्या सुनावणी दरम्यान संयुक्त कृती समितीने संपातून २४ तासानंतर माघार घेत असल्याचं जाहीर केलं. महावितरणमधील २९ पैकी ७ संघटनांच्या संयुक्त कृती समितीने पुकारलेल्या या संपात महावितरण, महापारेषण आणि महानिर्मितीतले जवळपास ३७ टक्के कर्मचारी सहभागी झाले होते.

**<><><><>**

तेलंगणा सरकारप्रमाणे राज्यातही ओबीसींना ४२ टक्के आरक्षण द्यावं अशी मागणी नागपूरात निघालेल्या ओबीसी मोर्चात करण्यात आली. राज्य सरकारनं ओबीसींकडे दुर्लक्ष केलं तर मुंबई, पुणे, ठाणे यासारख्या ठिकाणीही आंदोलन करण्याचा इशारा ओबीसी नेते विजय वड्डेट्टीवार यांनी दिला आहे. नागपूरात ओबीसी महामोर्चानंतर आयोजित सभेत ते

बोलत होते. राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी काढलेल्या शासन निर्णयामुळे राज्यातील ओबीसी समाज अस्वस्थ झाला असल्यानं हा शासन निर्णय सरकारने रद्द करावा या मागणीचा पुनरुच्चार त्यांनी केला. शासन निर्णयानंतर मराठवाड्यात दररोज हजारो प्रमाणपत्रांचं वाटप सुरू आहे. यामुळे राज्यात ओबीसी तरुणांचं आत्महत्यांचं सत्र सुरू झाल्याचा दावा त्यांनी केला. विदर्भातल्या विविध जिल्ह्यातल्या सकल ओबीसी संघटनांनी दुपारी निघालेल्या या मोर्चात सहभाग घेतला. त्यात विविध पक्षांच्या लोकप्रतिनिधींसह मोठ्या संख्येनं नागरिक सहभागी झाले होते.

**<><><><>**

ओबीसी आरक्षणाला किंचितही धक्का लागणार नाही, सरकार ओबीसींच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी कटीबद्ध आहे, असं आश्वासन ओबीसीविषयक मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलं आहे. जे खऱ्या अर्थाने पात्र कुणबी मराठा आहेत, केवळ त्यांनाच ओबीसी प्रमाणपत्रं मिळतील, अशी ग्वाही त्यांनी मुंबईत वार्ताहरांशी बोलताना दिली. पूरस्थितीमुळं झालेल्या नुकसानीचे पंचनामे अजून पूर्ण झालेले नाहीत. गरज पडली तर आणखी तालुके आणि गावांचा यात समावेश केला जाईल. जाहीरनाम्यात सांगितल्याप्रमाणे गरजू शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी करु असंही त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><>**

राज्यातल्या ॲप आधारित प्रवासी वाहतूक कंपन्यांसाठी राज्य शासनाने महाराष्ट्र मोटर वाहन ॲग्रिगेटर नियमांची घोषणा केली आहे. याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**- - होल्ड व्हीसी - -**

*(मोटर वाहन ॲग्रिगेटर नियम ई-रिक्षासह सर्व प्रवासी मोटार वाहनांना आणि त्यांच्या मालक कंपन्यांना लागू होतील. बाईक-टॅक्सी सेवांसाठी स्वतंत्र "महाराष्ट्र बाईक-टॅक्सी नियम, २०२५" लागू राहतील आणि त्यासाठी वेगळा परवाना घ्यावा लागेल. या नियमांनुसार मागणी वाढली तर या कंपन्या भाडं वाढवू शकतील मात्र हे भाडं, प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने ठरवलेल्या मूळ भाड्याच्या दीड पटीपेक्षा जास्त नसेल. मागणी कमी असेल मूळ दराच्या २५ टक्क्यापेक्षा कमी भाडं आकारता येणार नाही. वाहन चालकाला एका दिवशी जास्तीत जास्त १२ तास काम करता येईल आणि त्यानंतर त्याला १० तासाची*

*विश्रांती घ्यावी लागेल. प्रवाशांना ५ लाख रुपयांपर्यंतचा प्रवास विमा घेण्याचा पर्याय ॲपमध्ये अनिवार्यपणे उपलब्ध असावा, चालकाला राइड स्वीकारण्यापूर्वी प्रवाशाचे गंतव्यस्थान दिसणार नाही, असे ॲप डिझाइन असावे. वाहनं ८,९ वर्षांपेक्षा जास्त जुनी नसावी, अशी अट देखील या नियमात आहे. कंपनीत नोंदणी करण्यापूर्वी चालकांना ३० तासांचा प्रशिक्षण कार्यक्रम बंधनकारक असेल. चालकाचं सरासरी रेटिंग पाचपैकी दोन स्टार्सपेक्षा कमी असेल तर त्याला सुधारात्मक प्रशिक्षण घ्यावं लागेल आणि तोपर्यंत त्याला वाहन चालवता येणार नाही.)*

**<><><><>**

जागतिक मानसिक आरोग्य दिनाचं औचित्य साधत आज केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी राष्ट्रीय टेली मानसिक आरोग्य कार्यक्रम अर्थात टेली-मानस या ॲपचं अनावरण नवी दिल्लीत एका कार्यक्रमात केलं. हे ॲप इंग्रजी, हिंदी या भाषांसह दहा प्रादेशिक भाषांत उपलब्ध आहे. या ॲपमधून संवाद साधण्याची सुविधा असून आणिबाणीच्या परिस्थितीत मार्गदर्शन तसंच आवश्यकता असल्यास मदतही दिली जाणार आहे. टेली मानस हेल्पलाइनमध्ये काही सुधारणा केल्याचं नड्डा यांनी सांगितलं. यावर दररोज चार हजार दूरध्वनी येत असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रात कफ सिरपच्या सेवनामुळे झालेल्या मुलांच्या मृत्युची चौकशी करण्याची मागणी करणारी जनहित याचिका आज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या पीठासमोर आज या याचिकेवर सुनावणी झाली. या प्रकरणांवर संबंधित राज्य सरकारं आवश्यक ती पावलं उचलत असल्याची माहिती सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी यावेळी दिली. या प्रकरणावर आधीच आठ ते दहा जनहित याचिका दाखल झाल्यामुळे ही याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली.

**<><><><>**

परराष्ट्रमंत्री डॉ. एस जयशंकर आणि अफगाणिस्तानचे परराष्ट्रमंत्री मौलवी अमीर खान मुत्ताकी यांच्यात आज नवी दिल्लीत शिष्टमंडळ स्तरीय चर्चा झाली. यावेळी दोन्ही देशांनी सर्व स्वरुपातल्या दहशतवादी कारवायांबद्दल निषेध नोंदवला, तसंच शांतता, स्थैर्य

आणि परस्पर विश्वासाचं वातावरण राखण्याची गरज अधोरेखित केली. भारतविरोधी कारवाया करणाऱ्या कोणत्याही गट किंवा संघटनेला अफगाणिस्तानात थारा मिळणार नाही असं मुत्ताकी यांनी स्पष्ट केलं. पहलगाम हल्ल्याचा तीव्र निषेध केल्याबद्दल जयशंकर यांनी अफगाणिस्तानचे आभार मानले.

<><><>

ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांच्या मुंबई दौऱ्यामुळं ब्रिटनमध्ये १ अब्ज पौंडाची गुंतवणूक होणार आहे आणि १० हजार नवे रोजगार तयार होतील अशी माहिती ब्रिटनच्या भारतातल्या उच्चायुक्त लिंडी कॅमेरून यांनी दिली आहे. ब्रिटनमधून आतापर्यंतच सर्वात मोठं व्यापारी शिष्टमंडळ भारतात आल्यामुळं ही गुंतवणूक आणि रोजगारनिर्मिती शक्य झाल्याचं त्या म्हणाल्या.

<><><>

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज सिडनी इथे ऑस्ट्रेलियाचे सहाय्यक संरक्षण मंत्री पीटर खलील यांच्यासह पहिल्या भारत ऑस्ट्रेलिया संरक्षण उद्योग व्यवसाय गोलमेज परिषदेचं सह-अध्यक्षपद भूषवलं. या परिषदेत दोन्ही देशांमधली औद्योगिक भागीदारी आणि क्षमता विकासाला चालना देण्यात आली.

<><><>

केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ आणि ब्रिटनचे संरक्षण राज्यमंत्री वर्नोन कोकर यांच्यात आज मुंबईत बैठक झाली. यात उभय देशांमधलं सहकार्य दृढ करण्याच्या उपायांवर दोन्ही नेत्यांनी सविस्तर चर्चा केली. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर भारतीय नौदल आणि ब्रिटनचे नौदल यांच्यात कोकण–२५ हा द्विपक्षीय सागरी सराव यशस्वी झाल्याबद्दल कोकर यांनी समाधान व्यक्त केलं.

<><><>

गाझा पट्टीत आज दुपारपासून शस्त्रसंधी लागू झाल्याची घोषणा इस्राइली सुरक्षा दलानं केली आहे. हमाससोबत झालेल्या करारानुसार निर्धारित सीमारेषांमधून इस्राइली सैन्य मागे फिरलं. त्या बदल्यात हमास त्यांच्या ताब्यात असलेल्या इस्राइली नागरिकांची

मुक्तता करणार आहे. इस्राइलचे प्रधानमंत्री बेन्यामिन नेत्यान्यू यांनी शस्त्रसंधीबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

<><><><>

२०२५साठीचा शांततेचा नोबेल पुरस्कार व्हेनेझुएलाच्या मारिया कोरीना मच्याडो यांना आज जाहीर झाला. व्हेनेझुएलाच्या नागरिकांच्या लोकशाही हक्कांचं रक्षण करण्यासाठी मच्याडो यांनी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याबद्दल, तसंच देशाची हुकुमशाहीपासून लोकशाहीकडे देशाची वाटचाल शांततेत व्हावी, यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना हा पुरस्कार दिल्याचं नोर्वेच्या नोबेल समितीनं नमूद केलं.

<><><><>

नवी दिल्लीत अरुण जेटली मैदानावर आज सुरु झालेल्या वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात दिवसअखेर भारतानं २ बाद ३१८ धावा केल्या.

भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. सलामीच्या जोडीतला के एल राहुल ३८ धावा करुन बाद झाला. मात्र यशस्वी जयस्वालनं दीडशतकी दमदार खेळी केली. दुसऱ्या गड्यासाठी त्यानं साई सुदर्शनसोबत १९३ धावांची भागीदारी केली. साई सुदर्शन ८७ धावांवर बाद झाला. आजचा खेळ थांबला तेव्हा यशस्वी जयस्वाल १७३, तर कर्णधार शुभमन गिल २० धावांवर खेळत होता.

<><><><>

आसाममध्ये गुवाहाटी इथे झालेल्या बीडब्ल्युएफ जागतिक कनिष्ठ मिश्र सांघिक बॅडमिंटन स्पर्धेत आज भारतीय बॅडमिंटन संघाने कांस्यपदक पटकावलं. उपांत्य फेरीत भारताला इंडोनेशियाकडून ३५-४५, २१-४५ असा पराभव पत्करावा लागला. उन्नती हुडा हिने या संघाचं नेतृत्व केलं.

<><><><>

नैऋत्य मौसमी पावसाचा राज्यातून परतीचा प्रवास आजपासून सुरू झाला.  राज्यात मान्सूनच्या परतीची सीमारेषा अलिबाग, अहिल्यानगर, आणि अकोला तिथून जात आहे. पुढच्या तीन ते चार दिवसात राज्याच्या इतर भागातूनही मान्सूनच्या परतीसाठी परिस्थिती अनुकूल असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे.

//<><><><>//